# सावित्रीबाई फुले भाषण

1.

"झेलूनिया अंगावरती

शेना मातीची घान |

दिले विद्येचे ज्ञान

लेकी कराया सज्ञान |"

सावित्रीबाई फुले या संपूर्ण भारतभर व महाराष्ट्राला महात्मा ज्योतिबा फुले यांची पत्नी म्हणून परिचित आहे. परंतु त्यांचा हा परिचय इतक्या पुरताच मर्यादित नाही.सावित्रीबाईंनी स्वतःच्या म्हणजेच स्व कर्तुत्वाने आपले समाज सुधारण्याच्या क्षेत्रामध्ये वेगळे स्थान निर्माण केले आहे.

मराठी शिक्षणप्रसारक, समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी नायगाव तालुका खंडाळा जिल्हा सातारा या गावी झाला.

सावित्रीबाईंच्या आईचे नाव लक्ष्मीबाई, तर वडिलांचे नाव खंडोजी नेवसे पाटील होते. खंडोजी नेवसे हे गावचे पाटील होते. गावचे पाटील असणाऱ्या नेवसे यांचे घराणे हे पेशवे काळातील इनामदार घराणे होते.घरची परिस्थिती चांगली असल्याकारणाने साहजिकच सावित्रीबाईंचे बालपण अतिशय मजेत आणि सुंदर गेले.

त्यावेळच्या प्र थे प्रमाणे सावित्रीबाईचा विवाह सातारा जिल्ह्यातील कटगुन या गावच्या ज्योतिबा फुले यांच्याशी झाला. त्यावेळी सावित्रीबाईचे वय अवघे नऊ वर्षाचे होते तर ज्योतिबा यांचे वय तेरा वर्षाचे होते.

ज्योतिराव फुले यांचे शिक्षणाकडे विशेष आकर्षक होते. ज्योतिराव इंग्रजीचे शिक्षण घेत असतानाच त्यांचा विवाह दिवस सावित्रीबाई यांच्याशी झाला.

सावित्रीबाई यांचा विवाह जेव्हा झाला होता. तेव्हा त्या आपल्या सोबत ख्रिस्ती मिशनऱ्या कडून भेटलेले पुस्तक सोबत घेऊन जोतिबांच्या घरी आल्या होत्या.त्यावरून जोतिरावांनाही एक नवा मार्ग सापडला. त्यांनी स्वतः शिकून सावित्रीबाईंना शिकवले.

सावित्रीबाई फुले या मराठी शिक्षणप्रसारक, समाजसुधारक महिला होत्या. महाराष्ट्रातील स्त्रीशिक्षणाच्या आरंभिक टप्प्यात त्यांचे पती जोतिबा फुले यांच्यासह त्यांनी मोठी कामगिरी बजावली.

महात्मा फुले यांच्या समाज सुधारण्याच्या कार्यास सावित्रीबाई फुले यांनी मनापासून साथ दिली त्यांच्या कार्यात त्यांनी त्यांच्या बरोबरीने वाटा उचलला. हे कार्य करत असताना वेळप्रसंगी समाजाची निंदा व अवहेलना सुद्धा त्यांनी सहन केली.

1948 साली स्त्रिया व अस्पृश्य यांना शिक्षण देणे हा गुन्हा होता. त्या काळात महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांनी एक जानेवारी 1948 रोजी मुलींची पहिली शाळा भिडे यांच्या वाड्यात काढली.

- 26 january in marathi

त्यांनी ही काढलेली शाळा ही महाराष्ट्रातील पहिलीच मुलीची शाळा होती. त्या शाळेमध्ये सावित्रीबाई फुले या स्वतः मुख्याध्यापक म्हणून काम पाहू लागल्या. सुरुवातीला त्यांच्या शाळेमध्ये पाच ते सहा विद्यार्थिनी होत्या.पण १८४८ साल संपेपर्यंत ही संख्या ४०-४५ पर्यंत जाऊन पोहोचली.

या शाळेची प्रगती पाहून समाजातील अनेक सनातन्यांनी त्यांचा विरोध केला. अंगावर शेण फेकले. काही उन्मत्तांनी तर अंगावर हात टाकण्याची भाषा केली.घर सोडावे लागले. अनेक आघात होऊनही सावित्रीबाई डगमगल्या नाहीत
अनेक संघर्ष करत हा शिक्षणप्रसाराचा उपक्रम चालूच राहिला.

त्या काळामध्य बाला-जरठ विवाहप्रथेमुळे अनेक मुली वयाच्या बारा-तेराव्या वर्षी विधवा व्हायच्या. ब्राह्मण समाजात विधवा-पुनर्विवाह अजिबात मान्य नव्हता. पतीच्या निधनानंतर अशा विधवांना सती जावे लागे किंवा मग त्यांचे केशवपन करून कुरूप बनविले जाई.महात्मा

Download All Type PDF : https://pdfseva.com/

फुले यांना आपल्या समाजात विधवा स्त्रियांना भोगाव लागणाऱ्या यांना पाहून त्यांच्यासाठी काहीतरी करण्याची गरज वाटू लागली.

अशा दुर्दैवी स्त्रियांना दिलासा व  आधार देण्यासाठी महात्मा ज्योतिबा फुले यांनी 1863 मध्ये प्रतिबंधक गृह सुरू केले. सावित्रीबाईंनी ते समर्थपणे चालविले.सावित्रीबाई फुले यांचा सत्यशोधक समाजाच्या कार्यामध्ये  यामध्ये सहभाग असायचा.ज्योतिरावांच्या निधनानंतर सत्यशोधक समाजाचे कार्य कोणी करायचे असा प्रश्न निर्माण झाला होता. या अशा बिकट परिस्थितीत सावित्रीबाई स्वतः पुढे आल्या आणि महात्मा फुले यांच्या निधनानंतर सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा सांभाळली.

स्त्रियांनी शिकावे हे त्यांचे ब्रीद वाक्य होते.सावित्रीबाईंच्या सामजिक कार्याबद्दल कृतज्ञता म्हणून १९९५ पासून ३ जानेवारी हा सावित्रीबाईचा जन्मदिन हा *बालिकादिन* म्हणून साजरा केला जातो.सावित्रीबाई फुले या उत्तम लेखिका कवित्री सुद्धा होत्या त्यांनी काव्य फुले बावन कशी. सुबोध रत्नाकर इत्यादी साहित्य लिहिले.

१८९६-९७ सालांदरम्यान पुणे परिसरात प्लेगची साथ पसरली होती. हा जीवघेणा आजार अनेकांचे जीव घेऊ लागला.या प्लेटच्या साथीमध्ये अनेक लोकांचे हाल व जीव जाऊ लागला. यातून उद्भवणारे हाल ओळखून सावित्रीबाईंनी प्लेगपीडितांसाठी पुण्याजवळ वसलेल्या ससाणे यांच्या माळावर दवाखाना सुरू केला. त्या रोग्यांना व त्यांच्या कुटुंबीयांना आधार देऊ लागल्या. या दरमयान सावित्रीबाई फुले यांचे १० मार्च १८९७ रोजी निधन झाले.

अशा स्त्री मुक्ती आंदोलनाच्या खऱ्या अग्रणी माता सावित्रीबाईस विनम्र अभिवादन....

*" स्त्रियांच्या जीवनी होता अज्ञानाचा अंधार ,*

*क्रांति ज्योती तुम्ही दाविला ज्ञानाचा प्रकाश !*

*स्त्री शिक्षणाची ज्योत पेठवून केला उद्धार,*

*झेप घेण्या उंच खुले करून दिले आकाश !!"*

*2.*

# जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी. हे सार्थ पटवून दिलं...' सावित्रीबाई फुले यांनी !

थोर समाजसेवक महात्मा जोतिराव फुले यांची पत्नी सावित्रीबाई. नावाप्रमाणं पतीच्या पावलावर पाऊल ठेवून चालणारी स्त्री ! आपल्या देशाच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासातले हे एक आगळ वेगळं जोडपं वयाच्या अवघ्या ९ व्या वर्षी त्यांचा जोतीराबांशी विवाह झाला.

जोतिराव त्यावेळी होते अवघे १३ वर्षाचे. साल १८४०, स्त्रियांनी शाळेत जाण मान्य नव्हत; कर्मठ समाजाला. अशात जोतिराबांनी धारिष्टकेलं. सावित्रीबाईंना घरीच शिक्षण द्यायला सुरुवात केली. सावित्रीबाईंची देखील त्याना उत्तम साथ लाभली. एका ठिकाणी तर मी असं देखील बाचलंय जोतिरावांनी घरीच शिक्षण दिल्याचे , तसंच अहमदनगर येथील फरार बाईंच्या व पुण्यात मिचेलबाईंच्या नॉर्मल स्कूलमध्ये अध्यापनाचं प्रशिक्षण घेतलं होतं. असं शासकीय कागदपत्रांवरुन दिसून येतं. तसंच तत्कालीन दस्ताऐवजावरुनही असच स्पष्ट होतं की सावित्रीबाई याच भारतीय आद्यशिक्षिका आणि मुख्याध्यापिका होत ! मंडळी, म्हणजे त्यांनी "टाकलेलं पाऊल ' हीच आधुनिक भारतीय स्त्रीच्या सामाजिक जीवनाची' खरी खुरी सुरुवात म्हणायची !

जोतिराव आणि.सावित्रीबाई हे सर्वार्थांनं एकरुप असं जोडपं होतं. सावित्रीबाईंच्या जीवनातल्या काही गोष्टी मी वाचल्यात ! त्यापैकीच काही गोष्टी मला वाटतं तुम्हांलाही ठाऊक असतीलच ! तरी देखील मी त्या" पुनःस्मरण करुन देण्यासाठी सांगतेय...

जोतिराव नि सावित्रीबाईंच घरं होतं गरीब-दलित-कष्टकरी यांच्या वस्तीत. त्यांच्या प्रत्यक्ष सहवासात राहिलेल्या एका व्यक्तीनं.तर त्यांच्याविषयीचं पूर्ण चित्रचं आपल्या वर्णनातून उभं केलंय. ते म्हणतात, रोज सकाळी सावित्रीबाई लवकर उठत, सडासंमार्जन व स्नान हे सूर्योदयापूर्वीच होत असे. घर नेहमीच स्वच्छ असायचं. त्यांना दिवाण-खान्यात थोडादेखील केर किंबा धूळ खपत नसे. घरातील भांडी व इतर सामान देखील स्वच्छ व टापटीपीनं ठेवलेलं असायचं, स्वत: स्वयंपाक करायच्या. जोतिरावांच्या प्रकतीची नीट काळजी घ्यायच्या. ' सावित्री- बाईंचा पोषाख सुद्धा जोतिरावांसारखा

अगदी साधा. गळयात एक पोत मंगळसूत्र, कपाळावर कुंकू. अगदी साधी साडी. अन्य कोणताही अलंकार अंगावर नसायचा. '

“साधी राहणी नि उच्च विचारसरणी ' असावी हे या फुले दांपत्यान. जणू आपल्या वर्तनातून समाजाला सिद्धू करुन दाखवलं !

जोतिराव नि सावित्रीबाई यांचा स्नेह लाभलेल्या एका व्यक्ती त्यांचं केलेलं वर्णन; त्यांच्या शैक्षणिक-सामाजिक कार्यावर प्रकाशझोत टाकणारं आहे. बोलकं आहे ! सन १८४८ च्या ऑगस्टमध्ये त्यांनी सर्वप्रथम पुण्यात दलितमुस्लिमांसाठी शाळा काढली. समाजाकडून त्यावेळी कडबा ' विरोध झाला. तो पत्करुन सावित्रीबाई शाळेत शिकवायला जात होत्या. कुणीही कितीही शिव्याशाप दिले तरीही जरासुद्धा न ढळता शांतपणे नि धैर्याने काम करत होत्या. कांही वेळा तर त्यांच्या जाण्या-येण्याच्या मार्गावर काही टोळभैरव मुद्दामच उभे राहत. आचकट-विचकट बोलत; कधी दगड मारत. तर कधी अंगावर चिखल किंवा शेण टाकत! मग त्या शाळेत जाताना दोन साड्या सोबत नेऊ लागल्या. रस्त्यानं जाताना खराब झालेली साडी शाळेत गेल्यावर बदलावी लागे. परत फिरताना देखील एक साडी खराब होई. त्यांचा हा छळ असाच चालू राहिल्यामुळं संस्थेत शिपायाची नियुक्ती लहान मुलींच्या संरक्षणाच्या दृष्टीनं केली.

त्यानं लिहून ठेवलेल्या या संबंधींच्या आठवणी तर अंगावर काटा आणणाऱ्या आहेत. तो लिहितो. ' आपल्या अंगावर दगड किंबा चिखल फेकणाऱ्या टवाळांना त्या शांतपणे म्हणत, ' मी माझ्या भगिनींना शिकवण्याचे पवित्र कार्य करत असतां; तुम्ही माझ्या अंगावर फेकलेले दगड किंवा शेण ही मला फुलंच वाटतात. ईश्वर तुम्हाला सुखी ठेवो ! 'असं म्हणून त्या पुढे चालू लागत.

त्यांच्या धेर्यकथा किती सांगाव्यात. त्यावेळी बिधवा स्त्रियांचे समाजात फार हाल होत असत. त्यांचे केशवपन केले जाई. या ब्राह्मण विधवांच्या केशवपनाविरुद्ध दीनबंधू ' चे संपादक व त्या वेळचे कामगार नेते नारायण मेघजी लोखंडे यांनी सावित्रीबा्डच्या प्रेणेनंच नाभिकांचा संघटित संप घडवून आणला. हा एक ऐतिहासिक प्रसंग होता. असं म्हणतात की त्यावेळी इंग्लंडमधल्या स्त्रियांनी ' दि टाईम्स ' मधील हे वृत्त वाचून सावित्रीबाईंना अभिनंदनाचं पत्र देखील पाठवलं होतं.

जोतिराव-सावित्रीबाईंनी स्वत:च्याच घरात एक वसतिगृह देखील चालवलं होतं. लाबूंन-लांबून विद्यार्थी येऊन तिथं रहात. आई-बापाची माया या दांपत्याकडून अनुभवत लक्ष्मण

कराडी जाया या तेथील एका विद्यार्थ्यांने आपल्या आठवणी स्गांगताना म्हटलयं.' सावित्रीबाई –सारखी दयाळू व प्रेमळ अंत:करणाची स्त्री मी आजवर कुठेही पाहिली नाही. ' तर अन्य एका विद्यार्थ्यांना सांगितलयं.' सुस्वरूप, मध्यम बांध्याच्या, शांत अशा सावित्रीबाई ' काकू ' कायम हसतमुख असायच्या. स्त्री उन्नतीची त्यांना फार कळकळ होती. कधी रागावत नसत; दोघा पति-पत्नींत विलक्षण प्रेम व आदर होता. जोतिराव तात्या ' त्यांना अहो-जाहो करत; तर काकु जोतिरावांना ' शेठजी ! ' स्त्री शिक्षण सुरु केल्यावर पंडिता रमाबाई, डॉ. आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे यासारख्या पुण्यातील मोठ मोठ्य़ा सुशिक्षित बायका सावित्रीबाईंच्या भेटीला येत असत.

पुढे २४ डिसेंबर १८७३ ला' सत्यशोधक समाजाची ' स्थापना झाली. सावित्रीबाई त्याच्या खंद्या कार्यकर्त्या होत्या. " देशातल्या हजारो वर्षातल्या धार्मिक परंपरा नाकारुन त्या विरोधात विधायक विद्रोह करणारे समाजाने उचललेलं पहिलं क्रांतिकारी पाऊल सावित्रीबाईंच्याच पुढाकारान ! अशी नोंद समाजाच्या पहिल्या अहवालात देखील आढळते.

असे किती पैलु सांगावे सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्त्वाचे ! जोतिरावांना पक्षाघात झाला. आर्थिक परिस्थिती बिकट झाली. सामाजिक कार्याचा व्याप वाढला होता. अशाही परिस्थितीत त्या धीरानं तोंड देत. पतीची सेवा करत राहिल्या ! पण काळ कुणासाठी कधी का थांबलाय ? त्यानं जोतिरावांना बोलावून घेतलं. आणि मग त्यांच्या पुतण्याचा वारसा हक्कासाठी झगडा सुरु झाला. ' यशवंत या त्यांच्या दत्तक पुत्राला ते डावलू लागले. अंत्ययात्रेला त्याला ' टिटवे ' धरु देईनात. सावित्रीबाईंनी दुःख . बाजूला सारलं. टिटवी ' हाती धरुन अंत्ययात्रेपुढे चालू लागल्या. अतिशयं धीरानं जोतीबांना ' अग्नी ' देखील दिला ! आपल्यापतीलाएका स्त्री नं अग्नी देण्याचा हा इतिहासातील पहिलाच प्रसंग असेल ! वाजत-गाजत आणलेल्या पतीच्या अस्थींवर तिनं एक तुळशीवंदावन बांधलं. पूजा सुरु केली. नंतरही तिनं पतीचं कार्य नेटानं पुढे नेण्यात यश संपादन केलं. पण प्लेगच्या साथीत लोकांना बाचवता-वाचवता प्लेगची लागण होऊन ही कर्तृत्ववान स्त्री जोतिरावांच्या भेटीला गेली... चिरंतर झाली.

धन्यवाद

**By : www.PDFSeva.com**